


मीनाकुमारीः कमाल अमरोहींची पाकीजा

नेहमी उदास राहणारी, मितभाषी, शायरीत रमणारी, खऱ्या प्रेमाची आयुष्यभर प्रतीक्षा करणारी 'ट्रॅजेडीक्वीन' मीनाकुमारी एक कोडं बनूनच राहिली. तिच्या खासगी जीवनाविषयी अनेक प्रवाद असले तरी मीनाकुमारीच्या अभिनयाविषयी कधीच कोणाचं दुमत नव्हतं. पती कमाल अमरोही यांच्याच पाकीजामध्ये मीनाकुमारीची घायाळ करणारी अदा...